# नगर परिषद कार्यालय,मलकापूर

**स्थायी समिती सभा दिनांक 07/04/2021 चे कार्यवृत्त**

मलकापूर नगर परिषदेची स्थायी समितीची सभा मा.अध्यक्ष महोदय,नगर परिषद मलकापूर यांनी नोटीस क्रमांक नपम/अध्यक्ष/सभा/363/2021 दिनांक 31/03/2021 नुसार आज दि.7/4/2021 ला आयोजित करण्यात आली.सभेसाठी आवश्यक गणपुर्ती झाल्यावर सभेचे कामकाज सुरु करण्याअगोदर मा.अध्यक्ष यांनी आज जागतिक आरोग्य दिनाच्या सर्व सन्माननीय नगरसेवक व विभाग प्रमुख व कर्मचारी यांना हार्दीक शुभेच्छा दिल्या त्यानंतर मा.सभापती महोदय यांचे आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

1 **दिनांक 28/12/2020 रोजी बांधकाम समिती व दिनांक 31/12/2020 नियोजन समिती व दिनांक 9/2/2021 शिक्षण समितीच्या सभांचे कार्यवृत्तास मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

दिनांक 28/12/2020 रोजी बांधकाम समिती व दिनांक 31/12/2020 नियोजन समिती व दिनांक 9/2/2021 शिक्षण समितीच्या सभांचे कार्यवृत्तास मान्यता देणेबाबतचे प्रकरण व विषयासंबंधी ची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की,मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम समिती सभा दि.28/12/2020 रोजी तसेच नियोजन समितीची सभा दि.31/12/2020 व शिक्षण समितीची सभा दि.9/2/2021 रोजी झाली असून त्यांचे सभेत एकही वेळेवरचा विषय घेण्यात आला नसून त्यांचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक- राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक-अनिल शिवरतन गांधी

ठराव सर्वानुमते मंजूर

2 **दै.देशदुत दिनांक 26/01/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या प्र.क्र.7 अ मधील पारपेठ परिसरातील आसिफ खा रहेमान खा यांचे किराणा दुकान ते अशफाक खान यांचे घरापर्यत रस्ता बांधकाम करण्याकरीता आलेल्या कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

दै.देशदुत दिनांक 26/01/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या प्र.क्र.7 अ मधील पारपेठ परिसरातील आसिफ खा रहेमान खा यांचे किराणा दुकान ते अशफाक खान यांचे घरापर्यत रस्ता बांधकाम करण्याकरीता आलेल्या कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबतचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, दै.देशदुत दिनांक 26/01/2021 च्या दैनिक वर्तमान पत्रात प्र.क्र.7 अ मधील पारपेठ परिसरातील आसिफ खा रहेमान खा यांचे किराणा दुकान ते अशफाक खान यांचे

घरापर्यंत रस्ता बांधकाम करण्याकरीता आमदार निधी अंतर्गत निवीदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.त्यानुसार विहीत मुदती प्राप्त झालेल्या निवीदा खालील प्रमाणे.

(अंदाजपत्रकीय रक्कम 13.34 लक्ष)

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निवीदेत सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1 | एम जाहेद अहमद अ सलाम शेख | अंदाजपत्रकाच्या 12.52 %कमी दराने |
| 2 | ताहेर मोहम्मद लाहेरी | अंदाजपत्रकाच्या 12.17 %कमी दराने |
| 3 | काद्री खव्जा वाजीद मो | अंदाजपत्रकाच्या 7.51 %कमी दराने |

वरील निविदे मध्ये श्री.मोहम्मंद जाहेद अहमद अ.सलाम यांची निवीदा अंदाजपत्रकीय दराच्या 12.52% कमी दराची असुन त्यांनी शा.नि.27/09/2018 नुसार 54000/-रुपयांचा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरणा करण्याची सहमती दर्शविली आहे.तरी मो.जाहेद मो.अ.सलाम यांच्या कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबत सभेने योग्यतो निर्णय घ्यावा असे टिप्पणीत नमूद केले आहे.

वरील निविदे मध्ये श्री.मोहम्मंद जाहेद अहमद अ.सलाम यांची निवीदा अंदाजपत्रकीय दराच्या 12.52% कमी दराचे निविदेस आर्थीक व प्रशासकीय ही सभा मान्यता देत आहे.मा.सभापती यांनी नगर अभियता बांधकाम यांना सदर काम लवकर होण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिले.

सूचक- रशिदखॉ युसूफखॉ जमादार

अनुमोदक-राजेंद्र वसंतराव वाडेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

3. **दै.देशोन्नती दिनांक 29/01/2021 मध्ये प्रसिध्द निवीदा सुचनेनुसार मलकापूर न.प.तर्फे होणाऱ्या विविध विकास कामांसाठी आराखडे,अंदाजपत्रके,कामावर देखरेख ठेवणे करीता नेमण्यात आलेल्या सल्लागार यांचे प्राप्त निवीदेस कार्योत्तर मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

दै.देशोन्नती दिनांक 29/01/2021 मध्ये प्रसिध्द निवीदा सुचनेनुसार मलकापूर न.प.तर्फे होणाऱ्या विविध विकास कामांसाठी आराखडे,अंदाजपत्रके,कामावर देखरेख ठेवणे करीता नेमण्यात आलेल्या सल्लागार यांचे प्राप्त निवीदेस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचे प्रकरण व विषयासंबंधी टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेत श्री.अनिल शिवरतन गांधी,श्री राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सहभाग घेतला.मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत सदर कामाकरिता 3 निविदा प्राप्त झाल्या त्या नजरचुकीने दर्शविण्यात आल्या

नाही त्या वाचून दाखविण्यात आल्या मा.सभापती यांनी कार्यवृत्तात सदर निविदा दर्शविण्याचे निर्देश दिले.

ठरविण्यात येते की, दै.देशोन्नती दिनांक 29/01/2021 मध्ये प्रसिध्द निवीदा सुचनेनुसार मलकापूर न.प.तर्फे होणाऱ्या विविध विकास कामांसाठी आराखडे,अंदाजपत्रके,कामावर देखरेख ठेवणे करीता नेमण्यात आलेल्या सल्लागार यांचे प्राप्त निवीदा खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निवीदेत सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1 | अविनाश गोपाल जामोदे | अंदाजपत्रकाच्या 1.900% दराने |
| 2 | शुभम आर्किटेक्चर कंसल्टंट,पुणे | अंदाजपत्रकाच्या 1.910% दराने |
| 3 | स्वप्नपुर्ती कंसल्टंट | अंदाजपत्रकाच्या 1.690% दराने |

वरील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या सदर निविदा करिता नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.54/नवि-16 दिनांक 4 जुन 2018 मंत्रालय,मुंबई-32 नुसार विकास कामाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे,प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्यांच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या आहेत.त्या खालील प्रमाणे.

1. राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बाबतीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणून 3 टक्के इतके शुल्क विहीत करण्यात येत आहे.
2. तसेच राज्य शासनाने आयुक्त तथा संचालक,नगर परिषद प्रशासन संचालनालय यांच्या मार्फत राज्यातील नविन नगर परिषदा/नविन नगरपंचायतीसाठी नियुक्त केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांसाठी 2 टक्के इतके शुल्क विहीत केले आहे.ही 2 टक्के अधिकतम शुल्काची मर्यादा नागरी स्थानीक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात येणारा इतर सर्व कामांसाठी देखील लागु करण्यात येत आहे.यापेक्षा कमी शुल्कामध्ये प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्याची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या इतर सर्वकामांसाठी लागु राहील.
3. प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क प्रदान करण्याबाबतचे टप्पे खालील प्रमाणे विहीत करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरीका स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल किंमतीच्या प्रमाणात) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानातंर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्वकामांस |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | 0.75% (डिपी.आर 0.50%+प्र.मा. 0.25%) | 0.50% (डिपी.आर.0.33+प्र.मा.0.17%) |
| 2 | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | 0.25% | 0.16% |
| 3. | प्रकल्पाचे 25% कामपुर्ण झाल्यानंतर | 0.40% | 0.27% |
| 4 | प्रकल्पाचे 50% कामपुर्ण झाल्यानंतर | 0.40% | 0.27% |
| 5 | प्रकल्पाचे 75% कामपुर्ण झाल्यानंतर | 0.60% | 0.40% |
| 6 | प्रकल्पाचे 100% कामपुर्ण झाल्यानंतर | 0.60% | 0.40% |
| | एकूण | 3.00% | 2.00% |

वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी लागेल.सदरचा विषय सभेसमोर ठेवण्यात आला होता.न.प.सर्वसाधारण सभा ठराव क्र.15 दि.29/07/2020 नुसार सभेने शासन निर्णयानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्याच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचनानुसार व नियमानुसार कारवाई करण्यास व आवश्यक असल्यास अतिरीक्त व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबत सभेने मान्यता प्रदान केलेली आहे.

त्यानुसार दै.देशोन्नती दिनांक 29/01/2021 च्या अंकात ई-निवीदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.त्यानुसार विहीत मुदतीत तिन निवीदा प्राप्त झालेल्या असून नगर अभियंता यांनी सादर केलेल्या तुलनात्मक अहवालानुसार स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांचे दर सर्वात कमी असल्याचे नमुद केले आहे.प्राप्त निवीदा मंजूरीसाठी सभेसमोर ठेवावयाची होती,परंतू मा.जिल्हाधिकारी,बुलडाणा यांचे पत्रानुसार व विषेश रस्ता अनुदान,नगरोत्थान योजना ,वैशिष्टयपूर्ण इत्यादी योजनांचे प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे.त्याअनुषंगाने सदर कामासाठी स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांना कार्योत्तर मंजूरीच्या अधिन राहून कार्यारंभ आदेश देणे योग्य राहील असा अहवाल नगर अभियंता,बांधकाम विभाग यांनी मा.मुख्याधिकारी यांचेकडे सादर केला होता.सादर केलेल्या अहवालानुसार स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत मा.अध्यक्ष व मा.मुख्याधिकारी यांनी दिनांक 25/02/2021 रोजी आदेश पारीत करून कमी दराची स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांच्या निवीदेस मंजूरात प्रदान केली आहे. त्यानुसार स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.तरी वरील केलेल्या कार्यवाहीस सभेने

कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे टिप्पणीत नमूद केले आहे.

चर्चेत सहभागी होतांना श्री अनिल शिवरतन गांधी यांनी सभेचे निदर्शनास आणून दिले की निविदाधारक शुभम आर्किटेक्चर कंसल्टंट,पुणे यांनी स्वप्नपूर्तीच्या दराने काम करण्याबाबत पत्र दिले असून तरी निविदा मंजूर करतांना त्यांना पॅनलवर घेण्याबाबतची मागणी केली.तसे. स्वप्नपुर्ती कंसल्टंट हे वेळेवर उपलब्ध होत नसल्याने,सदर कामात पॅनल केल्यानंतर कामात गती येईल

चर्चेत सहभागी होतांना श्री राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सभेचे निदर्शनास आणून दिले की,निविदा ही स्पर्धात्मक दराकरिता मागविण्यात येते व शुभम आर्किटेक्चर कंसल्टंट,पुणे यांचे दर L 3 वर असल्याने त्यांना पॅनेलवर घेता येणार नाही स्पर्धात्मक निविदेस अर्थ राहणार नाही. शुभम आर्किटेक्चर कंसल्टंट,पुणे व स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांचे निविदेतील दर सर्वात कमी व समान असते तर त्यांना पॅनेल वर घेता आले असते तसे झालेले नसल्याने स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांची निविदा सर्वात कमी दराची असल्याने त्यांचीच निविदा मंजूर करण्यात यावी.
नगर अभियंता बांधकाम,व मुख्याधिकारी यांनी सभेचे निदर्शनास आणून दिले की निविदेतील कमी दर हे स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांचे असल्याने त्यांचीच निविदा मंजूर करावी लागेल

वरील सर्व बाबी विचारात घेवून स्वप्नपूर्ती यांना दर आठवडयातील दोन दिवस न.प.मध्ये कामाकरिता उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात यावे असे सभापती यांनी नगर अभियंता बांधकाम यांना आदेश दिले. मा.अध्यक्ष व मा.मुख्याधिकारी यांनी दिनांक 25/02/2021 रोजी आदेश पारीत करून कमी दराची स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांच्या निवीदेस मंजूरात प्रदान केली आहे. त्यानुसार स्वप्नपुर्ती कंसल्टंट यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.तरी वरील केलेल्या कार्यवाहीस हि सभा कार्योत्तर मंजूरी प्रदान करीत आहे.

सूचक- राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक-रशिदखॉ युसूफखॉ जमादार

ठराव बहुमताने मंजूर

4. **दै. मातृभूमी दिनांक 24/02/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निवीदे सुचनेनुसार सॉप्टसेन्स टेकोसर्व (इंडिया) प्रा.ली.नागपुर यांचा आदेश रद्द करुन आधार इंडस्ट्रीज मलकापूर यांच्या कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबत निर्णय घेणे**.

दै. मातृभूमी दिनांक 24/02/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निवीदे सुचनेनुसार सॉप्टसेन्स टेकोसर्व (इंडिया) प्रा.ली.नागपुर यांचा आदेश रद्द करुन आधार इंडस्ट्रीज मलकापूर यांच्या

कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबतचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,मलकापूर शहरातील फेरीवाला सर्वेक्षण करण्याकरीता दिनांक 24/02/2021 च्या दै.मातृभूमी या दैनिकात निवीदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.त्यानुसार विहीत मुदतीत तीन निवीदा प्राप्त झाल्या असून सदर निवीदांचा तुलनात्मक अहवाल प्रकल्प अधिकारी,न.प.मलकापूर यांनी सादर केलेला आहे.परंतू मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे आदेश क्रमांक नपम/2952/2019 दिनांक 06/11/2019 ला मलकापूर शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्याकरीता सॉप्टसेन्स टेकोसर्व(इंडीया) प्रा.ली.नागपूर यांना आदेशीत करण्यात आले होते.परंतू सदर संस्थेने सर्वेक्षण सुरु केले नाही.त्यामुळे सॉप्टसेन्स टेकोसर्व (इंडिया) प्रा.ली.नागपुर यांचा आदेश रद्द करण्यास व प्रकल्प अधिकारी,न.प.मलकापूर यांनी दै.मातृभूमी दिनांक 25/02/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या व विहीत मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहे.

| अ.क्र. | निवीदाधारकांचे नांव | दर |
|---|---|---|
| 1 | आधार इंडस्ट्रीज | 150 रु |
| 2 | आदर्श वस्तीस्तर संघ | 155 रु |
| 3 | आदर्श टेक्नीकल इन्सीटयुट | 157 रु |

वरील निवीदांचा तुलनात्मक अहवाल सादर केला त्यानुसार आधार इंडस्ट्रीज,मलकापूर यांचे दर सर्वात कमी आहे.तरी त्यांची कमी दराची आधार इंडस्ट्रीज मलकापूर यांची निवीदा मंजूर करण्यास व सॉप्टसेन्स टेकोसर्व (इंडिया) प्रा.ली.नागपुर यांना देण्यात आलेला आदेश क्रमांक नपम/2952/2019 दिनांक 06/11/2019 रद्द करण्याबाबत सभेने योग्यतो निर्णय घेण्यात यावा असें टिप्पणीत नमूद केले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेवून सॉप्टसेन्स टेकोसर्व (इंडिया) प्रा.ली.नागपुर यांना देण्यात आलेला आदेश क्रमांक नपम/2952/2019 दिनांक 06/11/2019 रद्द करण्यास तसेच मागविण्यात आलेल्या निविदेतील आधार इंडस्ट्रीज,मलकापूर यांचे दर सर्वात कमी आहे.तरी त्यांची कमी दराची आधार इंडस्ट्रीज मलकापूर यांची निवीदा मंजूर करण्यास व त्याचे कडून काम करण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थीक व प्रशासकीय काम ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक- अनिल शिवरतन गांधी

अनुमोदक- सौ.पुजा गोपाल राठी

ठराव सर्वानुमते मंजूर

5. **नगर परिषद मलकापूर मधील लेखा विभागामध्ये दुहेरी नोंद व इतर विविरण पत्रासाठी टॅली सॉफ्टवेअर खरेदी करण्यास मान्यता देणेबाबत निर्णय घेणे**.

नगर परिषद मलकापूर मधील लेखा विभागामध्ये दुहेरी नोंद व इतर विविरण पत्रासाठी टॅली सॉफ्टवेअर खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचे प्रकरण व विषयांसंबंधी ची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की, मलकापूर नगर परिषदेच्या लेखापाल यांनी लेखा विभागाकरीता दुहेरी नोंद व इतर विविरण पत्रासाठी टॅली सॉफ्टवेअरची मागणी संगणक विभागाकडे केलेली आहे.सदर सॉफ्टवेअरची अधिकृत्त कॉपी खरेदी करण्याकरीता बाजारपेठेत विचारणा केली असता Single user edition Standalone PCs (एका संगणकारीता) रुपये 18000+18%GST असा खर्च येईल असे टिप्पणीत नमूद केले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेवूननगर परिषद मलकापूर मधील लेखा विभागामध्ये दुहेरी नोंद व इतर विविरण पत्रासाठी टॅली सॉफ्टवेअर खरेदी करण्यास व त्या करिता येणाऱ्या खर्चास तसेच सदर चा खर्च न.प.फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक-सौ.पुजा गोपाल राठी

अनुमोदक-रशिदखॉ युसूफखॉ जमादार

ठराव सर्वानुमते मंजूर

6. **नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभा व इतर सभा ऑनलाईन सभा घेण्यासाठी झुम ॲपचे लायसन्स घेणेस मान्यता देणेबाबत निर्णय घेणे**.

नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभा व इतर सभा ऑनलाईन सभा घेण्यासाठी झुम ॲपचे लायसन्स घेणेस मान्यता देणेचे प्रकरण व विषयाची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेत राजेंद्र वसंतराव वाडेकर,सनाउल्लाखॉ रफिउल्लाखॉ यांनी सहभाग घेतला

ठरविण्यात येते की,नगर परिषद मलकापूर मध्ये प्रशासकीय कामकाज ामधील सर्वसाधारण सभा व इतर अनुषंगीक सभांकरीता महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन व काविड-19 प्रतिबंधक नियमानुसार ऑनलाईन घेणेबाबत शासन निर्णय क्रमांक कोरोना2020/प्र.क्र.76/नवि-14 दिनांक 03/07/2020 नुसार सभा ऑनलाईन घेण्याबाबत सुचना केलेल्या आहे.

ऑनलाईन झूम,गुगल मिट,वेबएक्स अशी सॉफ्टवेअर आहेत.परंतू सदर सॉफ्टवेअर मध्ये फ्री व्हर्जन मध्ये मिटींग रेकॉर्डीग होत नाही.तसेच सदस्य संख्या मर्यादा व वेळ मर्यादा आहेत.त्यामुळे मोठया कालावधी व सदस्य संख्येसाठी लायसन्स घेणे आवश्यक आहे.

वरील सर्व कामाकरीता झुम ॲप योग्य असल्याने यासाठी बेसीक प्लॉन रुपये 13,200+GST असा वार्षिक खर्च आहे.तरी झुम ॲपचे लायसेन्स घेण्याकरीता तसे येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरातीबाबत सभेची मान्यता आवश्यक आहे असे टिप्पणीत नमूद केले आहे.

चर्चेत सहभागी होतांना श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सभेचे निदर्शनास आणून दिले की ऑन लाईन सभेत एकाच वेळी अनेक सदस्य बोलतात त्यामुळे कळणे कठीण होते ऑनलाईन सभेत सहभागी होतांना कसे सहभागी व्हावे व कोणती दक्षता घ्यावा याबाबतचे प्रशिक्षण सर्व सदस्य व विभाग प्रमुख यांना देण्यात यावे जेणे करुन ऑनलाईन सभेत सहभाग घेणे सोयीचे होईल.

वरील सर्व बाबी विचारात घेता ऑन लाईन सभा घेण्याकरिता झुम ॲप योग्य असल्याने यासाठी बेसीक प्लॉन रुपये 13,200+GST असा वार्षिक खर्च करण्यास तसेच झुम ॲपचे लायसेन्स घेण्याकरीता तसे येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरात व सदरचा खर्च न.प.निधीतून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक-राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक-सनाउल्लाखॉ रफिउल्लाखॉ

ठराव सर्वानुमते मंजूर

7. **दै.लोकमत दिनांक 17/03/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या सन 2021-2022 करिता संगणक देखभाल दुरुस्ती व नविन साहित्य खरेदी करीता प्राप्त झालेल्या कमी दरांच्या ई-निवीदांना मान्यता देणेबाबत निर्णय घेणे .**

दै.लोकमत दिनांक 17/03/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या सन 2021-2022 करिता संगणक देखभाल दुरुस्ती व नविन साहित्य खरेदी करीता प्राप्त झालेल्या कमी दरांच्या ई-निवीदांना मान्यता देणेबाबतचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की सन 2021-2022 मध्ये संगणक विभाग नगर परिषद कार्यालय,मलकापूर करीता संगणक देखभाल व दुरुस्ती व नवीन साहित्य करीता वार्षिक दर मागविणेबाबत ई-निवीदा दिनांक 17/03/2021 ते 24/03/2021 या कालावधीकरीता प्रसिध्द

करण्यात आलेली होती.तसेच त्याबाबत दैनिक लोकमत मध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली होती.सदर निवीदामध्ये संगणक व त्यासंबधी गरजेनुसार लागणारे साहित्य व दुरुस्ती चे एकूण 103 बाबी करीता दर मागविण्यात आलेले आहेत.सदर निवीदा करीता एकूण तीन निवीदा धारकांनी निवीदा भरलेली असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवीदा धारकाचे नांव | नमुद एकत्रित रक्कम | मंजूरी |
|---|---|---|---|
| 1 | श्री.कॉम्पुटर सिस्टीम | 7,45,935/- | मंजूर |
| 2 | माउली कॉम्पुटर | 9,10,758/- | नामंजूर |
| 3 | श्री.मल्टी सर्विसिस | 9,49,276/- | नामंजूर |

वरील प्रमाणे श्री.कॉम्पुटर सिस्टीम यांचे एकत्रित दर सर्वात कमी असल्याकारणांमूळे त्यांची निवीदा मंजूर करणे योग्य राहील असा संगणक अभियंता यांनी अहवाल सादर केलेला आहे.तरी सभेने निवीदांकरीता आलेल्या दरांना प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करण्यास सभेने मान्यता दयावी असे टिप्पणीत नमूद केले आहे.

मा.सभापती महोदय यांनी श्री.कॉम्प्युटर सिस्टीम यांचे कामाबाबत विभाग प्रमुख यांना तक्रारी आहेत का सेवा त्वरीत उपलब्ध होते का याबाबत विचारणा केली सर्व विभाग प्रमुख यांनी सुविधा उपलब्ध होत असल्याचे सांगितले.

वरील सर्व बाबी विचारात घेता श्री.कॉम्पुटर सिस्टीम यांचे एकत्रित दर सर्वात कमी असल्याकारणांमूळेत्यांची निवीदा मंजूर करण्यास तसेच सदरचा खर्च न.प.निधीतून प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

सूचक- अनिल शिवरतन गांधी

अनुमोदक-राजेंद्र वसंतराव वाडेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

**8. दै.देशदुत दिनांक 19/03/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निवीदेसुचनेनुसार पाणी पुरवठा विभागाच्या कमी दराच्या तीन निवीदांना मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

दै.देशदुत दिनांक 19/03/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निवीदेसुचनेनुसार पाणी पुरवठा विभागाच्या कमी दराच्या तीन निवीदांना मान्यता देणेबाबत प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,पाणी पुरवठा विभागाच्या 3 कामांच्या खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या

**काम क्र.1 :- नगर परिषद निधी अंतर्गत धुपेश्वर पंपीग स्टेशनवरील 150HP VT पंप व मोटार ची दुरुस्ती करणे**

| अ.क्र. | 150 HP PUMP मोटारच्या दुरुस्तीचा तपशील | दुरुस्तीचे मटेरीयल | निवीदाधारकांचे नांव | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ढवळे इलेक्ट्रीकल्स चिखली | ढवळे इलेक्ट्रेको इंजीनीअरींग वर्क्स,चिखली | अनुज सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस चिखली |
| 1 | डिस्चार्ज हेड ग्लॅन्ड बुश | Gun Metal | 3980 | 3900 | 3950 |
| 2 | पंपशॉफ्ट स्लिव्ह | Stainless Steel | 7780 | 7600 | 7700 |
| 3 | लाईन शॉप्ट रिटेनर | Cast Iron | 28600 | 27500 | 28270 |
| 4 | लाईन शॉप्ट स्लिव्ह | Stainless steel | 25300 | 24200 | 24750 |
| 5 | लाईन शॉप्ट रबर बुश | Gun Metal | 42460 | 41800 | 42680 |
| 6 | डिस्चार्ज केस बुध | Gun Metal | 4560 | 4500 | 4550 |
| 7 | बाऊल बुश | Gun Metal | 24900 | 24000 | 24600 |
| 8 | सक्शन केस | Gun Metal | 4350 | 4200 | 4300 |
| 9 | नेकरींग | Gun Metal | 36540 | 36000 | 36300 |
| 10 | बरची थ्रस्ट बेरींग | Bearing No 29328 | 85600 | 85000 | 85500 |
| 11 | खालची थ्रस्ट बेरींग | Bearing No 6318 | 8550 | 8000 | 8500 |
| | एकूण | | 2,72,620 | 2,66,700 | 2,71,100 |

वरीलप्रमाणे कनिष्ट पाणी पुरवठा पर्यवेक्षक यांनी आलेल्या निवीदांचा तुलनात्मक अहवाल सादर केला असून सदर तुलनात्मक अहवालानुसार ढवळे इलेक्ट्रेको इंजिनीअरींग वर्क्स,चिखली यांचे दर(रुपये 2,66,700/-) सर्वात कमी असल्याचे नमुद केलेले आहे.

**काम क्र.2 :- न.प.निधी अंतर्गत धूपेश्वर पंपीग स्टेशन येथे VT पंपाची व मोटारची लोडींग व अनलोडींग सुलभरित्या करण्याकरीता ईलेक्ट्रीकल ट्राली बसविण्याबाबत**

| अ.क्र. | इलेक्ट्रीकल ट्राली बसविण्याचा कामाचा तपशील | निवीदाधारकांचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| | | ढवळे इलेक्ट्रीकल्स चिखली | ढवळे इलेक्ट्रेको इंजीनीअरींग वर्क्स,चिखली | अनुज सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस चिखली |
| 1 | 10 Tones cap geared trolley lift-6mtrs | 61,832/- | 63,835/- | 62,400/- |
| 2 | 5 Tones cap geared Trolley Lift -6 Meters | 37,000/- | 39,352/- | 38,500/- |
| 3 | Rail 30x30 with Guenet Plate & Plat form Trolley | 61,100/- | 64,400/- | 66,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (1150x1250) Rail Track -6 Meters Long | | | |
| 4 | Erection & Commissioning of avove Material | 51,212/- | 53,000/- | 54,300/- |
| | दुरुस्तीचे एकूण दर (18%GST सह) | 2,11,144/- | 2,20,587/- | 2,21,200/- |

वरील प्रमाणे कनिष्ट पाणी पुरवठा पर्यवेक्षक यांनी आलेल्या निवीदांचा तुलनात्मक अहवाल सादर केला असून सदर तुलनात्मक अहवालानुसार ढवळे इलेक्ट्रीकल्स,चिखली यांचे दर(रुपये 2,11,144/-) सर्वात कमी असल्याचे नमुद केलेले आहे.

**काम क्र.3 :- न.प.हद्दीतील हातपंप दुरुस्तीच काम करणे.(सन 2021-2022)**

| अ.क्र. | निवीदाधारकांचे नांव | निवीदेत सादर करावयाचे दर (प्रति हातपंप प्रमाणे) |
|---|---|---|
| 1 | वाजीद कादरी मलकापूर | 2680/- |
| 2 | मुश्ताक खान जब्बार खान,मलकापूर | 2610/- |
| 3 | अविनाश जामोदे | 2509/- |

वरील प्रमाणे कनिष्ट पाणी पुरवठा पर्यवेक्षक यांनी आलेल्या निवीदांचा तुलनात्मक अहवाल सादर केला असून सदर तुलनात्मक अहवालानुसार **अविनाश जामोदे प्रति हातपंप रुपये 2509/- इतके** कमी असल्याचे नमुद केलेले आहे.

तरी सभेने वरील तिन्ही कामांचे कमी दराच्या निवीदांना मान्यता देण्यात यावी असे टिप्पणीत नमूद करण्यात आले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेवून अनु क्रं1नगर परिषद निधी अंतर्गत धुपेश्वर पंपीग स्टेशनवरील 150HP VT पंप व मोटार ची दुरुस्ती करणे करिता ढवळे इलेक्ट्रेको इंजिनीअरींग वर्क्स,चिखली यांचे दर(रुपये 2,66,700/-) सर्वात कमी दर आहे.अनु क्रं.2 न.प.निधी अंतर्गत धूपेश्वर पंपीग स्टेशन येथे VT पंपाची व मोटारची लोडींग व अनलोडींग सुलभरित्या करण्याकरीता ईलेक्ट्रीकल ट्राली बसविण्याकरिता ढवळे इलेक्ट्रीकल्स,चिखली यांचे दर(रुपये 2,11,144/-) सर्वात कमी दर आहे.अनु क्रं.3 न.प.हद्दीतील हातपंप दुरुस्तीच काम करणे.करिता अविनाश जामोदे प्रति हातपंप रुपये 2509/- इतके सर्वात कमी दर असल्याने वरील कमी दराच्या निविदांना आर्थीक़ व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सूचक- अनिल शिवरतन गांधी

अनुमोदक- सौ.पुजा गोपाल राठी

ठराव सर्वानुमते मंजूर

9. **दै.महासागर दिनांक 11/02/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या दोन कामांच्या निवीदेसुचनेनुसार पाणी पुरवठा योजनेच्या वितरण नलीकेवरील लिकेंज दुरुस्तीकरीता लागणारे साहित्य,स्लूज व्हॉल,ऐयर व्हॉल,PVC पाईप इत्यादी कामाकरीता आलेल्या कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.**

दै.महासागर दिनांक 11/02/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या दोन कामांच्या निवीदेसुचनेनुसार पाणी पुरवठा योजनेच्या वितरण नलीकेवरील लिकेंज दुरुस्तीकरीता लागणारे साहित्य,स्लूज व्हॉल,ऐयर व्हॉल,PVC पाईप इत्यादी कामाकरीता आलेल्या कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबतचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेत श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर,अनिल शिवरतन गांधी यांनी सहभाग घेतला.

ठरविण्यात येते की,दै.महासागर दिनांक 11/2/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या दोन कामांच्या प्राप्त झालेल्या निविदा खालील प्रमाणे

**अनु क्रं.1 न.प.निधी अंतर्गत मलकापूर पाणी पुरवठा योजनेच्या पाणी पुरवठा योजनेच्या वितरण नलीकेवरील लिकेंज दुरुस्तीकरीता लागणारे साहित्य,स्लूज व्हॉल,ऐयर व्हॉल,PVC पाईप इत्यादी पुरवठा करणे**

| अ.क्र. | साहित्याचे नांव | निवीदाधारकाचे नांव व सादर केलेले दर | | |
|---|---|---|---|---|
| A | PVC PIPES 4 kg/CM2(1 Pipe 20 Ft long) | श्री.इंरीग्रेशन मलकापूर | शालीमार ईलेक्ट्रीकल मलकापूर | बी.ए.ट्रेडींग कॉपोरेशन मलकापूर |
| 1 | 90mm | 1390/- | 1411/- | 1399/- |
| 2 | 110 mm | 1880/- | 1950/- | 2030/- |
| 3 | 160 mm | 4100/- | 4225/- | 4035/- |
| 4 | 200 mm | 5295/- | 5325/- | 5299/- |
| 5 | 250 mm | 9298/- | 9321/- | 9315/- |
| B | Mechanical Joints Per No | | | |
| 1 | 90 mm | 1450/- | 1530/- | 1495/- |
| 2 | 110 mm | 1850/- | 1880/- | 1980/- |
| 3 | 160 mm | 3340/- | 3890/- | 4230/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | 200 mm | 4150/- | 4430/- | 4240/- |
| 5 | 250 mm | 6480/- | 6550/- | 6830/- |
| **C** | **Double Flang Sluice Valve-PN-1.6 without byepass arrangement** | | | |
| 1 | 100 mm | 8416/- | 8932/- | 8580/- |
| 2 | 150 mm | 11152/- | 12335/- | 11990/- |
| 3 | 200 mm | 21711/- | 22335/- | 24312/- |
| 4 | 250 mm | 33569/- | 34349/- | 33999/- |
| 5 | 300 mm | 42629/- | 43240/- | 43439/- |
| 6 | 350 mm | 64910/- | 66325/- | 65210/- |
| D | Kinetic Air Valve 80 mmPer No | 19990/- | 21580/- | 21230/- |
| F | Air Valve Ball 80 mm per No | 380/- | 425/- | 491/- |
| G | Air Valve Ball 100 mm per No | 599/- | 604/- | 603/- |
| **H** | **M.S.Flange** | | | |
| 1 | 80 mm | 800/- | 880/- | 930/- |
| 2 | 100 mm | 903/- | 1050/- | 925/- |
| 3 | 150 mm | 1105/- | 1214/- | 1190/- |
| 4 | 180 mm | 1404/- | 1625/- | 1440/- |
| 5 | 250 mm | 1690/- | 1725/- | 1729/- |
| 6 | 300 mm | 1985/- | 2155/- | 2020/- |
| 7 | 350 mm | 2950/- | 3503/- | 3230/- |
| **I** | **PVC Tail pipece 6kg/cm2** | | | |
| 1 | 90 mm | 204/- | 299/- | 315/- |
| 2 | 110 mm | 261/- | 278/- | 270/- |
| 3 | 160 mm | 555/- | 630/- | 610/- |
| 4 | 200 mm | 960/- | 1040/- | 1000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | 250 mm | 1450/- | 1680/- | 1510/- |
| **J** | **PVC Coupling 6kg/cm2** | | | |
| 1 | 90 mm | 170/- | 180/- | 188/- |
| 2 | 110 mm | 280/- | 285/- | 298/- |
| 3 | 160 mm | 690/- | 698/- | 730/- |
| 4 | 200 mm | 1160/- | 1186/- | 1220/- |
| 5 | 250 mm | 1870/- | 1890/- | 2005/- |
| **K** | **PVC Tee 6kg/cm2** | | | |
| 1 | 90 mm | 350/- | 355/- | 472/- |
| 2 | 110 mm | 650/- | 588/- | 540/- |
| 3 | 160 mm | 1600/- | 888/- | 840/- |
| 4 | 200 mm | 3500/- | 2640/- | 2730/- |
| 5 | 250 mm | 5500/- | 3750/- | 3540/- |
| **L** | **PVC Reducer 6kg/cm2** | | | |
| 1 | 90 mm | 300/- | 325/- | 380/- |
| 2 | 110 mm | 500/- | 550/- | 570/- |
| 3 | 160 mm | 850/- | 925/- | 950/- |
| 4 | 200 mm | 2600/- | 2702/- | 2802/- |
| 5 | 250 mm | - | - | - |
| **M** | **Packing Russi (Perkg)** | | | |
| 1 | 8 mm | 1150/- | 1250/- | 1310/- |
| 2 | 10 mm | 1050/- | 1060/- | 1070/- |
| 3 | 12 mm | 950/- | 980/- | 1020/- |
| N | Solution per Lit | 200/- | 280/- | 240/- |
| O | Black Rubber Sheet (per kg) | 400/- | 450/- | 470/- |
| P | Nuts Bolts (per kg) | 200/- | 250/- | 270/- |
| Q | Hacksaw Blade Per No | 60/- | 65/- | 74/- |
| | **Total** | **280886** | **288013** | **2,87,595/-** |

वरील प्रमाणे कनिष्ट पाणी पुरवठा पर्यवेक्षक यांनी मलकापूर पाणी पुरवठा योजनेच्या वितरण नलिकेवरील लिकंज दुरुस्तीकरीता लागणारे साहित्य,स्लुज व्हॉल,ऐयर व्हॉल,PVC पाईप लाईन साहित्याचे सर्वात कमी दर **श्री इंरीग्रेशन,मलकापूर (2,80,886/-) इतके** असल्याचा तुलनात्मक अहवाल सादर केलेला आहे त्यानुसार कमी दराच्या निवीदेस मान्यता देणेबाबत सभेने योग्यतो निर्णय घेण्यास सादर.

**क्रं.2 न.प.निधीतून मलकापूर पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहरातील हातपंप दुरुस्ती करिता लागणारे साहित्य पुरवठा करणे.**

| अ.क्र. | साहित्याचे नांव | निवीदाधारकाचे नांव व सादर केलेले दर | | |
|---|---|---|---|---|
| | | श्री.इंरीग्रेशन मलकापूर | शालीमार ईलेक्ट्रीकल मलकापूर | बी.ए.ट्रेडींग कॉपोरेशन मलकापूर |
| 1 | ISI Mark Hand pump completewith Telescopic stand,Watter tank With 1`2 G.I Pipe &12 Connecting Rod | 51500 | 52800 | 53200 |
| 2 | Handle | 2150 | 2230 | 2180 |
| 3 | Bearing 6204 | 240 | 275 | 250 |
| 4 | Cylinder | 5300 | 5700 | 5450 |
| 5 | Upper Valve Assembly | 877 | 905 | 899 |
| 6 | Lower valve Assemb;y | 691 | 720 | 780 |
| 7 | Chain | 475 | 530 | 515 |
| 8 | Rod Coupling | 120 | 128 | 138 |
| 9 | Axle | 180 | 198 | 203 |
| 10 | Water Tank | 1650 | 1688 | 1703 |
| 11 | 12mm Connecting Rode (3mEach) | 588 | 630 | 599 |
| 12 | 32mm G.I Pipe B-class 3mtr lenth both side and one copling | 1905 | 2023 | 1999 |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषयसूची विषय क्रं.1 ते 9 चे कामकाज पूर्ण झाल्याने उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभापती यांचे आदेशानुसार सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले

HMRawalpov.

(हरीश महादेवसिंह रावळ)

सभापती,

स्थायी समिती,

नगर परिषद,मलकापूर